# संगीत-नाटक महोत्सवाचे उद्‌घाटन

## नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजन; एकांकिकांचे सादरीकरण



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित संगीत-नाटक महोत्सवात बोलताना विभाग प्रमुख डॉ. अंजली निगवेकर. शेजारी डॉ. रणधीर शिंदे, ज्येष्ठ नाटककार संभाजी सावंत, निखिल भगत.**

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित संगीत-नाटक महोत्सवात व्याख्यान, एकांकिकांचे सादरीकरण झाले. ज्येष्ठ नाटककार, लेखक संभाजी सावंत यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्‌घाटन झाले.

मराठी भाषा विभागाचे विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे अध्यक्षस्थानी होते. महोत्सवाच्या प्रथम सत्रामध्ये श्री. सावंत यांनी 'नाट्यकलेचे बदलते स्वरूप' विषयावर व्याख्यान झाले. त्याप्रसंगी त्यांनी नाट्यनिर्मितीच्या उगमापासून ते आजच्या एकूणच रंगभूमीचा आढावा घेतला. नाटकाची भाषा, बोलीभाषा व प्रमाणभाषा याबद्दलही मार्गदर्शन केले. ज्ञानेश मुळे दिग्दर्शित 'तोच चंद्रमा नभात' एकांकिकेचे नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. नेपथ्य डॉ. संजय तोडकर यांनी केले होते. महोत्सवाच्या दुसऱ्या सत्रामध्ये प्रसिध्द गायक डॉ. शशांक मक्तेदार यांचे बहारदार शास्त्रीय गायन झाले. ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर या घराण्यांच्या तालमींचा त्रिवेणी संगम त्यांच्या गायनातून रसिकांना अनुभवता आला. निखिल भगत (तबला) व अमित साळोखे (हार्मोनियम) यांनी संगीत साथ दिली. डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी कलाकारांचा परिचय करून दिला.



विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी प्रास्ताविक केले. विकास कांबळे व अतुल परीट यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. राजश्री खटावकर यांनी आभार मानले.

# शिवाजी विद्यापीठातील कार्यक्रम रद्द

कोल्हापूर : 'कोरोना'च्या पार्श्वभूमीवर दक्षता म्हणून शिवाजी विद्यापीठातील पुढील दोन आठवड्यांमध्ये नियोजित केलेले व्याख्याने, शिबिर, आदी स्वरुपातील सर्व जाहीर कार्यक्रम रद्द केले आहेत. कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक हजेरी बंद करण्याबाबत येत्या दोन दिवसांत निर्णय घेण्यात येणार आहे.विद्यापीठ अनुदान आयोगाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दक्षता म्हणून जाहीर कार्यक्रम रद्द करण्याची सूचना केली आहे.

# विद्यापीठातील कार्यशाळा स्थगित

शिवाजी विद्यापीठात येत्या दहा ते बारा दिवसात नियोजित कार्यशाळा, संमेलने, व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) करोना व्हायरसच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी विद्यापीठ प्रशासनाला परिपत्रक पाठवून नियोजित कार्यक्रम स्थगित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पुढील आठवड्यात विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्यस्तरीय कार्यशाळा प्रस्तावित होती.



# विद्यापीठे, महाविद्यालयांतील गर्दीचे मोठे कार्यक्रम टाळा

## यूजीसीच्या सूचना; खबरदारीचे पाउल

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात होणारे गर्दीचे कार्यक्रम टाळावेत, अशा खबरदारीच्या सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंना पत्राद्वारे दिल्या आहेत.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय व आरोग्य मंत्रालय यांनी कोरोना विषाणूच्या अनुषंगाने आवश्यक तातडीच्या उपाययोजना व प्रतिबंधात्मक गोष्टी करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार यूजीसीचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी ५ मार्चच्या पत्राद्वारे सर्व विद्यापीठांना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांना ताप, खोकला, श्वसनास त्रास होत असल्यास तत्काळ शिक्षकांनी त्यांची डॉक्टरांकडून तपासणी करून घ्यावी.



कोरोनाची लक्षणे आढळून आलेल्या संशयित विद्यार्थ्यांस डॉक्टरांच्या सल्लाशिवाय महाविद्यालय, विद्यापीठात येण्यास मज्जाव करावा. विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये हँड वॉश, सॅनिटायजर्स उपलब्ध करून देण्यात यावेत. रेस्ट रूमध्ये मुबलक पाणी व साबण ठेवण्यात यावेत. पान ८ वर ▶

# विद्यापीठे, महाविद्यालयांतील गर्दीचे मोठे कार्यक्रम टाळा

**(पान १ वरून)** वसतिगृहातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून घेतली जावी, अशा सूचना यूजीसीने केल्या आहेत.

**इराकमधील चार विद्यार्थ्यांना मायदेशात राहण्याच्या सूचना**

शिवाजी विद्यापीठात इराक, इराण, बांग्लादेश, केनिया, अफगाणिस्तान, मॉरिशस, झिम्बाब्वे यासह आफिक्रेतील काही देशांचे सुमारे ५४ विद्यार्थी वाणिज्य, बायोटेक्नॉलॉजी, मायक्रोबायलॉजी, पदार्थविज्ञानशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत. यातील २४ जण विद्यापीठात राहतात.

विद्यापीठात शिकणारे इराकचे चार विद्यार्थी महिन्यापूर्वी मायदेशी गेले आहेत. कोरोनोच्या पार्श्वभूमीवर त्यांना विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय घडामोडी कक्षाच्या वतीने व्हॉटस् ग्रुपद्वारे पुढील आदेश होऊपर्यंत मायदेशात राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. खबरदारी म्हणून परदेशी विद्यार्थ्यांच्या व्हिसा, पोसपोर्टची चालू स्थितीबाबतची माहिती मागविली आहे. परदेशी विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवण्यात येत असल्याची माहिती आंतरराष्ट्रीय घडामोडी कक्षाचे संचालक डॉ. अनिल घुले यांनी दिली.

आंतरराष्ट्रीय घडामोडी कक्षाच्या वतीने लवकरच परदेशी विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे. २१ मार्च रोजी होणारा परदेशी विद्यार्थ्यांचा मेळावाही रद्द करण्यात आला आहे.

काही दिवसांपूर्वी विद्यापीठाच्या परीक्षांची माहिती राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने मागविली आहे. यूजीसीने पाठविलेल्या पत्रानुसार महाविद्यालयांनी कार्यवाही करावी, अशा सूचना दिल्या आहेत. विद्यापीठात होणारे मोठे कार्यक्रम रद्द करण्यात आल्याचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

# ‘अध्ययन, अध्यापन प्रक्रियेत नवीन बदल आवश्यक’

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आजच्या तंत्रज्ञान युगातील बदलांनुसार शिक्षणक्षेत्रातील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानानुसार झालेले बदल आत्मसात करून अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्नशील राहावे, असे प्रतिपादन शिक्षणशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी केले.

शिक्षणशास्त्र विभाग येथे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व शिक्षणशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ‘शैक्षणिक साधनांचे बदलते स्वरूप’ या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यशाळेचे उद्घाटन कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांचे हस्ते झाले. डॉ. गुरव म्हणाले, शिक्षण प्रक्रियेतील बदल लक्षात घेऊन अभ्यासक्रम तयार झाले आहेत; पण याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे.

कार्यशाळेत भोगावती महाविद्यालय कुरुकली येथील ग्रंथपाल पी. एस. कल्लोळी यांनी ‘कनेक्टिंग क्लासरूम’ विषयावर मार्गदर्शन केले. भैरवनाथ माध्यमिक हायस्कूल भुयेवाडी येथील शिक्षक एम. आर. पाटील यांनी ‘अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर’ विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. नगिना माळी, डॉ. सुप्रिया पाटील, श्रीराम सोनवणे, सरस्वती कांबळे उपस्थित होते.

# कल्पनाशीलता हे कुसुमाग्रजांच्या वाङ्मयाचे वैशिष्ट्य

## अविनाश सप्रे : शिवाजी विद्यापीठामध्ये मराठी अधिविभागातर्फे व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : स्वत:च्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाशी प्रामाणिक राहून कवी कुसुमाग्रजांनी वस्तुनिष्ठ जीवनदृष्टीतून लेखन केले. त्यातून त्यांची दृष्टी अभिजातवादाकडे झुकलेली होती. त्यांच्या दृष्टीत मानवतावाद, उदारमतवाद, आधुनिकतेचा प्रत्ययही येतो. कल्पनाशीलता हे त्यांच्या वाङ्मयाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक डॉ. अविनाश सप्रे यांनी बुधवारी येथे केले.

कवी कुसुमाग्रजांच्या स्मृतिदिनानिमित्त विद्यापीठातील मराठी अधिविभागातर्फे त्यांचे 'कवी कुसुमाग्रजांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व' या विषयावर व्याख्यान झाले. भौतिकशास्त्र सभागृहातील या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, तर प्रा. लक्ष्मीनारायण तरोडी प्रमुख उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी ज्येष्ठ समीक्षक डॉ.अविनाश सप्रे यांचे व्याख्यान झाले.

### लढण्याचे बळ मिळते

साहित्यिकांची निर्मिती आणि भूमिका ही काळाला नेहमी पथदर्शक राहते. कुसुमाग्रजांची कविता काळाशी लढण्याचे बळ देते. त्यामुळे वर्तमानकाळाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या शब्दांचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे, असे मत डॉ. पानसरे यांनी व्यक्त केले.

डॉ. सप्रे म्हणाले, कवी कुसुमाग्रजांच्या एकूण वाङ्मयाचा पिंडधर्म हा कवित्वाचा असून त्यांच्या काव्यवृत्तीचा संचार समग्र साहित्यातून प्रकट झालेला आहे. प्रारंभी कवी कुसुमाग्रज आणि संत तुकाराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. रघुनाथ कडाकणे, अनाधी खासबागदार, विजया वाडकर, आदी उपस्थित होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी आभार मानले.

# विद्यापीठात यशवंतराव चव्हाण जयंती उत्साहात

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची १०७ वी जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, गजानन पळसे, अॅड. धैर्यशील पाटील, डॉ. आर.व्ही. गुरव, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.